नि. २३

## नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात

रे.मु.नं.३४५/२०२३

**वादी**

शेखर सुनिलदत्त येवले,वगैरे

**प्रतिवादी**

भिमराज भुताराम पुरोहित, वगैरे

**याकामी वादी नं. १ तर्फे सरतपासणीचे पुराव्याचे शपथपत्र असे ते खालीलप्रमाणे :-**

**याकामी मी शेखर सुनिलदत्त येवले वय ३८ वर्षे रा.सोनई, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

सदरचा दावा मी व इतर वादी यांनी प्र.वादी विरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दावा दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही मौजे सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथील गट नं. ९४४/१ पैकी क्षेत्र ०.०२.०० हे.आर.चौ.मी., ० रु ११ पैसे चतुसिमा पुर्व खोसे यांचे हॉस्पीटल, दक्षिण उदर पालवे यांची मिळकत, पश्चिम अंतर्गत रस्ता, उत्तर वादग्रस्त रस्ता, येणे प्रमाणे शेती मिळकत, त्यातील सर्व तदंगभुत वस्तुसह, दगड, माती व हक्कासह तसेच अतिक्रमित बांधकामासह काही एक राखुन न ठेवता. मी, इतर वादी व प्र.वादी नं. १ हे मौजे सोनई, ता.नेवासा येथील कायमचे रहिवासी असुन प्र.वादी नं. २ ग्रामविकास अधिकारी असुन व प्र.वादी नं. ३ हे गावचे सरपंच आहेत.

मौजे सोनई ता.नेवासा येथील वर नमुद दावा मिळकत हिच्या उत्तरेस माझे व वादी नं. १ ते १५ यांच्या कायम खरेदी मालकीच्यानिवासी बिनशेती गट नं. ९४७/१३/१/अ क्षेत्र ३.५९.०० आर.चौ.मी. या क्षेत्रामध्ये मी व इतर वादी यांनी त्यांच्या नावावर असलेल्या मिळकतीवर राष्ट्रीयकृत बँकेकडुन घर बांधणीसाठी कर्जबाब घेऊन व काही लोकांनी स्वकष्टार्जित उत्पन्नातुन निवासी बंगले बांधुन गेली ३५ वर्षापासुन वास्तव्य करत आहे. आमच्या गट नं. ९४७/१३/१/अ कडे येणारा रस्ता हा सोनई घोडेगांव रस्त्याच्या पश्चिमेस असुन त्याठिकाणी वादी यांची श्रीराम बँक कॉलनी या नावाने वसाहत वसलेली असुन त्या ठिकाणी प्र.वादी नं. २ व ३ यांनी लाईट, रस्ता, ड्रेनेज, व इतर सेवा सुविधा पुरविलेल्या आहेत. .

R & R
27/01/25
copy received 28/3/2025

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

आमचे यांचे वसाहती मध्ये येणारा रस्ता हा सोनई घोडेगांव रस्त्यापासुन पश्चिमेस जवळपास १५ फुट रुंदीचा अस्तित्वात असुन सदर रस्त्याच्या दक्षिणेस गट नं. ९४४/१ पैकी मधील ०.०२ आर, क्षेत्राचे मालक प्र.वादी नं. १ हे असुन त्यांनी त्यांच्या क्षेत्रात बांधकाम करत असतांना प्र.वादी नं. २ व ३ यांची कोणत्याही प्रकारे कायदेशिर ले आऊट मंजुर करुन परवानगी घेतलेली नाही. अगर सदर बांधकामाचे ले आऊट प्लॅन मंजुरही केलेले नाही. तसेच सदरहु प्र.वादी नं. १ यांनी बांधकाम करत असलेल्या क्षेत्राची अद्यापही स्थानिक प्रशासन म्हणजेच प्र.वादी नं. २ व ३ यांचे दप्तरी मिळकत सदरी नोंद केलेली नसल्याने प्र.वादी नं. १ यांना गाव नमुना नंबर ८ चा उतारा देखिल प्र.वादी नं. २ व ३ याचकडुन अद्याप देण्यात आलेला नाही. त्यामुळे प्र.वादी नं. १ यांनी सदर बांधकाम करत असतांना रस्त्याचे मध्यापासुन सोडवायाचे विशिष्ट अंतर न सोडता रस्त्यावरच अतिक्रमण करुन जवळ जवळ १५ फुटाचा रस्ता पाठीमागे अस्तित्वात असताना सदर बांधकाम हे केवळ ८ फुट रस्त्याचे अंतर धरुन सुरु केलेले आहे. ते बेकायदेशिर आहे. तरी सदरचे बांधकाम हे प्र.वादी नं. २ व ३ यांच्या पुर्वपरवागनी शिवाय व कुठल्याही बांधकाम विषयक कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने व रस्त्यावर अतिक्रमण केलेले असल्याने आम्ही राहत असलेल्या कॉलनीतील सर्व रहिवाश्यांचा सदरच्या अतिक्रमणामुळे येण्या जाण्याचा, वाहतुकीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदरचे अतिक्रमण केल्यामुळे वाद रस्त्याने दोन वाहने ये जा करणे मुश्किलीचे झालेले आहे. अगर एक मोठे वाहन व पायी चालणारे यास देखिल जीव मुठित धरुन त्या रस्त्याने ये जा करणे भाग पडत आहे. या अतिक्रमित रस्त्यामुळे अपघात होऊन जिवीत हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे.

सदरचे काम हे त्वरीत बंद करण्यात यावे, म्हणुन आम्ही प्र.वादी यांना दि. ०३.०४.२०२३ रोजी विधीज्ञा मार्फत नोटीस बजावणी केलेली आहे. सदरची नोटीस प्र.वादी यांना दि. ०६.०४.२०२३ रोजी मिळुनही प्र.वादी नं. १ यांनी दिवसरात्र काम चालु ठेऊन नोटीसीचा अवमान करुन बांधकाम व रस्त्यावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच अद्यापही प्र.वादी नं. १ याने बांधकाम बंद केलेले नाही., त्यामुळे प्र.वादी नं. २ व ३ यांनी दि. ११.०४.२०२३ रोजी जावक क्र. ४१/२०२३ अन्वये बेकायदेशिर बांधकाम बंद करणे बाबत नोटीस बजावणी केलेली आहे.

प्र.वादी नं. १ हे बेकायदेशिर रित्या पैश्यांच्या व मनगटाच्या जोरावर सदरचे कृत्य करण्याचा प्रयत्न करत आहे. मी व इतर वादी सुशिक्षीत व नोकरीस असल्याने त्यांनी समजोत्याने प्र.वादी नं. १ यास रस्त्यावर करीत असलेले अतिक्रमण थांबविण्याबाबत वेळोवेळी विनंत्या केल्या. परंतु त्यास न जुमानता त्याने बांधकाम चालुच ठेवलेले आहे. म्हणुन प्र.वादी नं. १ याने रस्त्यावर केलेले अतिक्रमण व त्या अनुषंगाने चालु असलेले बांधकाम करु नये म्हणुन प्र.वादी नं. १ विरुध्द सदरचा निरंतर ताकीत मनाई हुकूमाचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. प्र.वादी नं. २ व ३ हे यांचे विरुध्द कोणतेही प्रकारची कायदेशिर मागणी नसुन केवळ त्यांच्या कार्यक्षेत्रात सदरचे रस्त्यावर बेकायदेशिर अतिक्रमण चालु असल्याने त्यांना या दाव्यात प्र.वादी पणात समाविष्ट केलेले आहे.

सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्र.वादी यांना मे.कोर्टाची समन्स बजावणी झाली. त्यानंतर प्र.वादी हे सदरचे दाव्यात हजर झालेले आहे. सदरचे दाव्यात आम्ही जे काही कागदपत्र दाखल केलेले आहे ते सर्व खरे व बरोबर असुन त्यांना निशाणी नंबर देण्यात यावा व ते पुराव्याकामी वाचण्यात यावे.

**तरी माझी विनंती की, :-**

प्र.वादी नं. १ याने रस्त्यावर केलेले अतिक्रमण व त्या अनुषंगाने चालु असलेले बांधकाम करु नये म्हणुन प्र.वादी नं. १ विरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूम देववावा ही विनंती. इतर योग्य ते न्यायाचे हुकुम आमचे बाजुने व्हावेत.येणे प्रमाणे ॲफिडेव्हिट दिले असे.

अधिक्षक
जी न्यायालय क.स्तर
नेवासा

नेवासा
दि.27/01/25

ॲफिडेव्हिट करणार

ओळख
(ॲड. आर.पी.पाठे)

**याकामी मी शेखर सुनिलदत्त येवले वय ३८ वर्षे** (धंदा शेती) **रा.सोनई, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर सत्यप्रतिज्ञेवर** खरे सांगतोत की. वर लिहिलेला संपुर्ण मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यांचे सत्यतेसाठी या लेखाखाली मी माझी सही केली असे.

नेवासा

दि. 27/01/25

ॲफिडेव्हिट करणार

Solemnly affirmed before me
by Shekhar Sunildatta Yevale, Age 38 Yrs
who is identified before me
by Adv. R. R. Rathe
whom I personally know

Occ Service
R/o Sonai
Tal - Nevasa
Dist A'nagar
P.D. 3816 0938 0395

Asstt Superintendent

आज रोजी साक्षीदार प्रथमसत्रापासून हजर. दुपारी १:५० मि. पर्यन्त वाट पाहिली. प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ गैरहजर. सबब उलटतपास नाकारला.

दि. २०/०१/२०२६.

20/1/26.

डॉ. पी. आर. शुगावकर
दि. न्या. क. स्तर, नेवासा